PRO

Policy Research Organization

चर्चेअंती एकमताने आलेल्या

# सूचना

# Roundtable on Urban Policy

SUMMER SESSION
2025



Policy Research Organization

# भूमिका

पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन या शहरी धोरणांविषयी काम करणाऱ्या आमच्या अभ्यासगटातर्फे पुण्यात १० मे २०२५ रोजी  एक दिवसभराची एक गोलमेज बैठक आयोजित करण्यात आली होती. 'महापालिकांचे अर्थसंकल्प आणि शहरांची अर्थनीती' या विषयाला धरून ही बैठक संपन्न झाली. राजकीय नेते, नागरी गटांचे प्रतिनिधी, अर्थतज्ज्ञ, प्रसिद्धीमाध्यमांतील व्यक्ती, विविध क्षेत्रात काम करणारे सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी अशा वेगवेगळ्या पार्श्वभूमीच्या नागरिकांना या बैठकीसाठी निमंत्रित केले होते.

महानगरपालिकांची आर्थिक स्थिती मजबूत करण्याबरोबरच उभा राहणारा पैसा योग्य पद्धतीने वापरला जाणे, त्याबद्दल पारदर्शकता बाळगणे या मुख्य मुद्द्यांना धरून अतिशय रचनात्मक अशी ही चर्चा झाली. केवळ टीका नाही तर प्रत्येक पातळीवरील (शहर, राज्य, व केंद्र) सरकार यांच्यासाठी काही सूचना व मागण्या या मंथनातून पुढे आल्या. सर्वांनी एकमताने पाठींबा दिलेल्या सूचना व मागण्या या पत्रकात एकत्र केल्या आहेत.

**तन्मय कानिटकर**

अध्यक्ष, पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन

# महानगरपालिकांसाठी सूचना

१. समाविष्ट गावांबाबत कोणती विकासकामे केली, निधी किती उपलब्ध झाला, याविषयी सहा महिन्यांनी त्याच्या अंमलबजावणीचा अहवाल प्रसिद्ध करावा, जेणेकरून पुढच्या अर्थसंकल्पातील तरतुदीसाठी आकडेवारी सार्वजनिकरित्या उपलब्ध असेल.

२. मिळकत कराचे प्रमाण हे महानगरपालिका पुरवत असलेल्या सेवांशी जोडावे. उदाहरणार्थ पाणी, सांडपाणी शुद्धीकरण, रस्त्यांची उपलब्धता, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची उपलब्धता, उद्याने, क्रीडांगणे, शाळा, रुग्णालये, अग्निशमन दल इ. सेवा किती प्रमाणात उपलब्ध आहेत, त्यांचा दर्जा काय याचे सूत्र ठरवून त्यानुसार कर आकारणी व्हायला हवी. जास्त सेवा असतील तिथे जास्त कर.

३. मिळकत कर हा जगभर महानगरपालिकांचा उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. तो जास्त प्रमाणात गोळा व्हायला हवा. सध्या मिळकतीचे बाजारमूल्य वाढत राहते पण मिळकत कर कमीच राहतो. मिळकत कराचे दर रेडी रेकनरच्या दरांना जोडायला हवेत. त्याचे एक कायमस्वरूपी सूत्र नक्की करावे. यामुळे शहराचे मिळकतकराचे उत्पन्न वाढत राहील.

४. आज पुणे महापालिकेत हजारो कोटींची मिळकत कर आणि पाणीपट्टीची थकबाकी आहे. ही थकबाकी वेगाने वसूल करण्यासाठी ठोस उपाययोजना राबवणे गरजेचे आहे. ज्या प्रकरणात न्यायालयात खटले सुरू असतील ते विशेष न्यायालयामार्फत वेगाने निकाली काढण्यासाठी शासनाने प्रयत्न करायला हवेत.

५. मिळकत कराच्या थकबाकीबाबतीत महापालिकेकडून ‘अभय योजना’ राबवली जाते. अभय योजनेचा लाभ कोणत्याही मिळकतधारकाला आयुष्यात एकदाच वापरता येईल अशी तरतूद करावी. एका मिळकतधारकाला अभय योजनेचा लाभ पुन्हा घेता येणार नाही असा नियम असावा.

# महानगरपालिकांसाठी सूचना

६. पुणे महानगरपालिकेचा 'सर्वंकष वाहतूक आराखडा' आहे. परंतु त्याच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पात भरघोस तरतूद करायला हवी अन्यथा आराखडा कागदावरच राहतो. ही तरतूद किती असावी हे कळण्यासाठी 'पर्यावरण सद्यस्थिती अहवालाच्या' धर्तीवर दरवर्षी 'वाहतूक सद्यस्थिती अहवाल' तयार करावा आणि त्या आकडेवारी आणि अभ्यासाचा वापर करून अर्थसंकल्पाची आखणी व्हावी.

७. 'सहभागी अंदाजपत्रक' या उपक्रमात नागरिकांनी थेट सुचवलेल्या कामांची तरतूद अर्थसंकल्पात केली जाते. ही कामे सुचवण्याची प्रक्रिया केवळ एक महिना नव्हे तर वर्षभर सुरू राहायला हवी. तसेच नागरिकांना ती सुचवणे सोपे जावे यासाठी महानगरपालिकेच्या मोबाईल प्रणालीमध्ये आणि संकेतस्थळावर सोय करावी.

८. सहभागी अंदाजपत्रकात सुचवलेली व अर्थसंकल्पात समाविष्ट झालेली सर्व कामे प्राधान्याने, पहिल्या सहा महिन्यातच करायला घेण्याचे बंधन घालावे. यातले प्रत्येक काम पुढच्या अर्थसंकल्पाच्या आधीच पूर्ण झालेले असले पाहिजे असा नियम केला जावा.

९. सहभागी अंदाजपत्रकात लोकांकडून आलेल्या अर्जातील कोणती कामे अर्थसंकल्पात समाविष्ट झाली, त्यामागची कारणमीमांसा काय हे सगळे महानगरपालिकेने स्वतःहून जाहीर करायला हवे. माहिती अधिकार कायद्याच्या कलम ४(१)(ड) नुसार महापालिकेला हे कागदावर बंधनकारक आहेच, पण त्याची अंमलबजावणी करावी.

१०. पुणे महापालिकेच्या अर्थसंकल्पात आरोग्यावरचा खर्च वाढवण्याची गरज आहे. तो किमान दुप्पट करायला हवा म्हणजे वस्ती पातळीवर दवाखाने, ससून व्यतिरिक्त इतर दवाखान्यातही औषधांची उपलब्धता इत्यादी गोष्टी प्रत्यक्षात येऊ शकतील.

# महानगरपालिकांसाठी सूचना

११. या वर्षी भांडवली खर्च करून नव्याने उभारलेल्या पायाभूत सोयीसुविधांच्या प्रमाणात त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पात तरतूद करणे आवश्यक आहे. केवळ महापालिकाच नाही तर केंद्र सरकारच्या JNNURM किंवा अमृत या सारख्या योजनांतून केल्या जाणाऱ्या विकासकामांना देखभालीसाठी तरतूद मिळणे आवश्यक आहे.

१२. विकास आराखडा हे शहराचे पुढील २० वर्षांचे नियोजन असते. दरवर्षी अर्थसंकल्पातील किमान १०% तरतूद शहरांचा विकास आराखडा अंमलात आणण्यासाठी केली जावी. तसेच ५% तरतूद विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या भूमीअधिग्रहणासाठी करावी.

१३. शहरांत मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. मात्र स्थलांतरितांची नेमकी आकडेवारी कोणत्याच सरकारी यंत्रणांकडे आज उपलब्ध नाही. ही आकडेवारी त्यांना कामावर ठेवणाऱ्या व्यावसायिकांकडून गोळा करावी. स्थलांतरितांचे शहराचे एक रजिस्टर असावे, व त्यानुसार स्थलांतरितांसाठी, विशेषतः गरीब स्थलांतरितांसाठीच्या, त्यांच्या कुटुंबासाठीच्या योजनांची तरतूद अर्थसंकल्पात करता येईल.

१४. महानगरपालिका कायद्याव्यतिरिक्त इतरही अनेक कायद्यांनुसार महापालिकांना काही जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. त्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी महानगरपालिकांच्या अर्थसंकल्पात पुरेशी आर्थिक तरतूद करण्याची गरज आहे.

# महाराष्ट्र राज्य सरकारसाठी सूचना

१. महानगरपालिकेच्या हद्दीत नवीन गावे समाविष्ट केली जातात. त्यावेळेस त्या गावांच्या पायाभूत विकासासाठी किती खर्च लागणार आहे, तो निधी कुठून उभा राहणार आहे याचे सविस्तर आणि नेमके नियोजन करून ते जाहीर करावे.

२. शहरांमध्ये शासकीय यंत्रणांच्या अधिकारांची गुंतागुंत झालेली दिसते. महानगरपालिका, प्राधिकरणे, राज्य सरकार, महामेट्रोसारख्या कंपन्या इ. वेगवेगळ्या यंत्रणा शहरांच्या वेगवेगळ्या विषयात निर्णय घेत असतात. त्यांचे आपापले प्राधान्यक्रम असतात आणि त्यानुसार निधीची तरतूद होते. मात्र शहर एक म्हणून एकमेव आणि ठोस अधिकार असणाऱ्या यंत्रणेची आवश्यकता आहे, ज्यामुळे विकासकामांमध्ये सुसूत्रता येईल. आणि ती यंत्रणा महानगरपालिकाच असावी कारण थेट लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी बनलेली ती स्थानिक स्वराज्य संस्था आहे.

३. महानगरपालिकांचा अर्थसंकल्पाचा एकूण आकार किती आणि प्रत्यक्षात किती अंमलबजावणी झाली याची आकडेवारीसह सर्व महानगरपालिकांची क्रमवारी राज्य सरकारने दरवर्षी जाहीर करावी.

४. 'ई-ग्राम स्वराज' पोर्टलच्या धर्तीवर सर्व महानगरपालिकांसाठी एक सार्वजनिक पोर्टल असावे. महानगरपालिकेचे अर्थसंकल्प, विविध अहवाल, शिवाय महापालिकांची विविध बाबतीतील अद्ययावत माहिती या पोर्टलवर अपलोड करण्याची सोय महापालिकांना द्यावी. अद्ययावत माहिती या पोर्टलवर अपलोड केल्याशिवाय महानगरपालिकांना शासकीय निधी वितरीत केला जाऊ नये.

# महाराष्ट्र राज्य सरकारसाठी सूचना

५. शहरांमधील प्रकल्प, त्यांची झालेली अंमलबजावणी, अर्थसंकल्पाची अंमलबजावणी, प्रकल्पात झालेली दिरंगाई या आधारे महानगरपालिकांच्या कार्यक्षमतेची क्रमवारी दरवर्षी जाहीर करावी. CIBIL स्कोरच्या धर्तीवर महानगरपालिकांना गुण असावेत.

६. अनेकदा शहरांच्या काठावर असणारी गावे रूढार्थाने ग्रामीण उरलेली नसतात. त्यामुळे ‘शहरी भाग’ कशाला म्हणावे याची नव्याने व्याख्या करावी. तसेच अशा निमशहरी भागाच्या विकासासाठी स्वतंत्र धोरण राबवावे.

# भारत सरकारसाठी सूचना

१. भारत सरकारकडून अनेक योजनांमार्फत महानगरपालिकांना निधी दिला जातो. हा निधी देताना काही अटी घातल्या जातात उदाहरणार्थ क्षेत्र सभा कायदा, शहरासाठी पार्किंग धोरण इ. मात्र कित्येक वर्षे उलटली तरी महानगरपालिका त्यांची अंमलबजावणी करत नाहीत. 'आधी अंमलबजावणी, नंतर निधी' हे धोरण अंमलात आणावे. अंमलबजावणीशिवाय निधी वितरीत करू नये.

२. ७४व्या घटनादुरुस्तीनंतर सत्तेचे विकेंद्रीकरण झाले असले तरी आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी महानगरपालिकेच्या उत्पन्नासाठी करांचे नवीन मार्ग शोधायला हवेत. शहरी भागातून गोळा होणाऱ्या आयकरातील काही वाटा थेट महानगरपालिकांच्या खात्यात देण्यासारख्या चौकटीबाहेरच्या उपाययोजनांचा विचार व्हावा, जेणेकरून राज्य किंवा संघराज्य सरकारांकडून येणाऱ्या निधीची वाट बघायची वेळ महानगरपालिकांवर येणार नाही.

# नागरिक आणि प्रसिद्धी माध्यमांसाठी सूचना

१. शहराचे अर्थकारण, अर्थसंकल्पातील तरतुदी, त्याची अंमलबजावणी, त्यातील पारदर्शकता हे निवडणुकांचे मुद्दे व्हायला हवेत यासाठी उपक्रम राबवायला हवेत.

२. नागरी गटांनी धोरणात्मक बदलांविषयीच्या सूचना वारंवार सरकारकडे द्यायला हव्यात. त्या सूचनांना माध्यमांनी व्यापक प्रसिद्धी द्यावी. तसेच पाठपुरावा करावा, सरकारला जाब विचारावा.

३. पत्रकार आणि प्रसिद्धीमाध्यमांच्या प्रतिनिधींसाठी सार्वजनिक अर्थकारणाविषयी प्रशिक्षण घेण्यात यावे.

# सहभाग

## मसुदा लेखन

नेहा महाजन (संचालिका, पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन)
तन्मय कानिटकर (अध्यक्ष, पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन)

## मसुदा तयार करताना झालेल्या गोलमेज बैठकीतील सहभागी व्यक्ती

शेखर गायकवाड (अतिरिक्त संचालक, यशदा), विवेक वेलणकर (अध्यक्ष, सजग नागरिक मंच), शीतल पवार (कार्यकारी संपादक, सकाळ मिडिया), मंदार शिंदे (बालहक्क कृती समिती), डॉ सायली जोग (प्राध्यापिका, गोखले इन्स्टिट्यूट), हर्षद अभ्यंकर (संचालक, सेव्ह पुणे ट्रॅफिक मुव्हमेंट), डॉ विष्णू श्रीमंगले (मनोदय संस्था), दीपक जाधव (जागल्या, आरोग्य हक्क समिती), संग्राम खोपडे (रेडीओ जॉकी आणि सामाजिक कार्यकर्ता), प्रज्ञा शिदोरे (ग्रीनअर्थ सोशल डेव्हलपमेंट कन्सल्टिंग), वैभवी पिंगळे (अर्थशास्त्र प्राध्यापिका), इंद्रनील सदलगे (सहकारनगर नागरिक मंच), मनोज जोशी (वेदभवन नागरिक मंच), अतुल पाटील (बावधन नागरिक मंच), चंदन देसाई (TDH, India), मयूर रानडे (राजकीय अभ्यासक, सल्लागार).





गोलमेज बैठकीत सहभागी सर्व मान्यवर

**Policy Research Organization**

# संपर्क

Website: policyresearch.in
Email: contact@policyresearch.in
Contact No.: +91 8007971692 / +91 9823431138

